
कर्मवीर

# भाऊराव पाटील

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय :
दा. क्र.







BVBK-0402942

बी. वा.
२९७२
३९१३१९

● संस्कारक्षम चरित्रमालिका ●

# कर्मवीर भाऊराव पाटील

२९७२ ३९१३१९
बी. वा.



लेखक
श्री. अरविंद पाटोळे

BVBK-0402942

मे. सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.

# अनुक्रमणिका


भाऊरावांचे थोरपण २
आधुनिक भगीरथ ५
पाटील मूळचे देसाई ६
वंशवेल ९
बालपणीचे संस्कार ११
बालपण व शिक्षण १३
छत्रपतींनी हेरले १५
सत्यप्पाने मार्ग दाखविला १५
अस्पृश्यतांबद्दल कळवळा १७
वसतिगृहातील बंडखोरी १८
भाऊरावांचा सत्यबाणा १९
नोकरी करायची नाही २१
बीज अंकुरले ! २३
संस्थेचा पाया घातला २४
मुष्टी योजना २५
स्वावलंबी शिक्षण २७
स्मारके २९
मुलांवरची माया २९
संत गाडगेबाबांकडून गौरव ३०
भाऊराव व ठक्कर बाप्पा ३२
म. गांधींकडून गौरव ३२



*प्रकाशक : मुद्रक :*

**प्रकाश य. कुंदूर**

**मे. श्रीराम ऑफसेट**

**क्वालिटी प्रिंटर्स आणि पब्लिशर्स**

सर्व्हे नं. १४/२३ 'गायत्री',
मु. पो. धायरी, पुणे ४१.

*: प्रमुख विक्रेते :*

**मे. सरस्वती ग्रंथ भांडार**

अप्पा बळवंत चौक,
पुणे २.

**मे. सरस्वती बुक डेपो**

नवी पेठ, सोलापूर ७.



*लेखक :*

**श्री. अरविंद पाटोळे**

स-न. २३/८ हिल पॉइंट
सह. गृहरचना संस्था
प्लॉट नं. ११, श्रीधरनगर
धनकवडी,
पुणे ४३.



आवृत्ती : १९९४



© सर्व हक्क प्रकाशकांकडे



किंमत १० रुपये

391310

# भाऊरावांचे थोरपण

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. समाजातील तळागाळातील जनतेसाठी झिजणारांची भूमी आहे. त्यागाची सर्वोच्च परिसीमा गाठणारांची भूमी आहे. स्वराज्याच्या आकांक्षेचा वृक्ष याच भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांनी लावला. पेशव्यांनी आपला पराक्रम अटकेपार पोहोचवला. छत्रपती शाहू महाराजांनी व्यायामाला राजाश्रय देऊन समतेची दृष्टी दिली. लो. टिळकांनी स्वातंत्र्याची गर्जना केली तर म. फुले, महर्षी शिंदे यांनी समाजकार्याबरोबरच शिक्षणाचे महत्त्व विशद केले.

आज भारतात महाराष्ट्र राज्य शिक्षणात सर्वत्र आघाडीला दिसते आहे. महाराष्ट्र ही शिक्षणाची प्रयोगशाळा झाली आहे. म्हणूनच संपूर्ण भारत देश या भूमीकडे शैक्षणिक मार्गदर्शनासाठी डोळे लावून बसला आहे. या गोष्टीचे श्रेय या भूमीत म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले, आगरकर, चिपळूणकर, लो. टिळक, महर्षी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे या नंदादीपांना आहे. या शिक्षणकार्य करणारांच्या दीपमालेतील आणखी एक दीपक म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील हे होत.

भाऊराव पाटलांनी शिक्षणक्षेत्रात जे बहुमोल कार्य केले त्याला तोड नाही. शिक्षण-गंगेचा ओघ त्यांनी निर्माण केला. नुसता निर्माणच केला असे नव्हे तर खेड्यापाड्यांतून, वाड्यावस्त्यांमधून तो प्रवाह पोहोचविला. ग्रामीण जनतेची ज्ञानाची तृष्णा शमविण्याचा प्रयत्न केला. रंजल्यागांजलेल्यांना आपला उद्धार आपल्या स्वतःच्या हातानेच करून घेण्याचा मार्ग खुला करून दिला.

"विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली । नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले । एवढे सारे एका अविद्येने केले."

म. ज्योतिबा फुले यांनी विद्येच्या बाबतीत, समाजाच्या अधोगतीच्या बाबतीत हे जे सूत्र सांगितले होते त्याचे नेमके वर्म कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जाणून घेतले व ही अविद्येची परिस्थिती बदलण्यासाठी स्वतःच्या संसाराची पर्वा न करता या कार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले होते.

सामाजिक कार्यात भाऊरावांनी महात्मा फुले, महात्मा गांधी, छत्रपती शाहू यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवला. सत्यशोधक चळवळीत भाग घेतला. अस्पृश्योद्धाराचा कार्यक्रम राबविला. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यात भाग घेतला. समाजात समता रुजविण्याचा प्रयत्न केला. तरुणांना शिक्षणाद्वारे समतेचे महत्त्व पटवून दिले. आज सामाजिक कार्यात बहुजनसमाजाचे लोक आहेतच पण ते सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातही आता दिसताहेत याचे श्रेय भाऊरावांकडेच जाते.

भाऊरावांनी समाजसेवा करताना स्वतः खूप त्याग केला. असीम निष्ठा, पराकोटीची सचोटी सांभाळली, निःस्वार्थीपणाबाबत तर राष्ट्रसंत गाडगेबाबा व भाऊराव एकाच

पंक्तीत बसतील. त्यांनी अखंड परिश्रम केले म्हणूनच जनतेने स्वतः होऊन त्यांना 'कर्मवीर' ही पदवी अर्पण केली.

महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतील दीन-दुबळ्या, दरिद्री, मरणासन्न समाजाला त्यांनी संजीवनी दिली. त्यांच्यात चेतना भरून त्यांना जागृत केले. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. त्यांच्या हक्कांची आठवण करून दिली.

भाऊरावांचे प्रत्येक कार्य अतिशय मोलाचे आहे. तरीपण आज भाऊराव पाटील ओळखले जातात, ते शिक्षणाचे खरेखुरे शिल्पकार म्हणूनच. त्यांनी खेड्यापाड्यांतून, वाड्या-वस्त्यांतून केलेल्या शैक्षणिक कार्यानेच आजचा महाराष्ट्र घडण्यास मदत झाली. महाराष्ट्राचा जुना चेहरामोहरा पार बदलूनच गेला.

विसावे शतक विज्ञानाचे, गतिमानतेचे; एकविसावे शतक त्याच्याही पुढच्या प्रगतीचे. त्याला सामोरे जाण्यास देश समर्थ हवा. त्यासाठी भारत सरकारने शिक्षणात काही नवी तत्त्वे स्वीकारली. पण भाऊरावांनी पासष्ट-सत्तर वर्षांपूर्वीच या तत्त्वांचा स्वीकार केला होता. म्हणूनच त्यांचे शैक्षणिक विचार हे मूलगामी विचार ठरले आहेत.

समता, बंधुता, स्वातंत्र्य या भारतीय घटनेतील अत्यंत महत्त्वाच्या त्रिसूत्रीचा त्यांनी आपल्या कार्यात मनापासून स्वीकार केला; तळमळीने प्रचार केला व हिरिरीने प्रसार केला. कोणतीही गोष्ट प्रथम त्यांनी पारखली. तिच्या-संबंधी मूलगामी विचार केला. स्वतः तिचा पूर्णपणे स्वीकार केला मग इतरांना सांगितली.

संत रामदासांच्या उक्तीप्रमाणे 'हे तो स्वप्रचितीची जाण' त्यांनी स्वतः प्रचीती घेतली.



खेडेगावातील आपल्या लोकांना विद्येचे मोल समजावून देणारे कर्मवीर.

मग 'आधी केले । मग सांगितले.' स्वतः कृती केली. ती गोष्ट प्रत्यक्षात जीवनात स्वीकारली आणि मग स्वतःच्या आचरणातूनच इतरांना ती स्वीकारण्याची प्रेरणा दिली. म्हणूनच संत रामदासांची 'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले' ही उक्ती प्रत्यक्षात येथेच साकारली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यास कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांचा आशीर्वाद मिळाला, तर राष्ट्रपिता म. गांधी, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताचे पोलादी पुरुष वल्लभभाई पटेल, लोकनेते जयप्रकाश नारायण, भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू, बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, वि. स. खांडेकर, साने गुरुजी, आचार्य अत्रे इ. थोर विचारवंतांची प्रशंसाही मिळाली.

❑ ❑ ❑

## आधुनिक भगीरथ

रानावनात, उन्हापावसात शतकानुशतके पडलेल्या दगडाच्या शिळेला प्रभुरामाच्या पायांचा स्पर्श झाला. या शिळेची अहिल्या झाली. स्त्रीत्वाला मुक्ती मिळाली. तिचा उद्धार झाला.

आपला इथला समाजही वर्षानुवर्षे नव्हे कित्येक शतके अज्ञानात पडला होता. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांचे जंगल त्याभोवती वाढले होते. धार्मिकतेतील अमानवीय गोष्टींचे रणरणते ऊन त्याला चटके देत होते. अशा जड समाजाचा उद्धार करायचा असेल तर त्याला 'ज्ञानस्पर्शच' झाला पाहिजे हे भाऊराव पाटील यांनी बरोबर ओळखलं.

म. फुले यांनी शिक्षणाचं महत्त्व नेमक्या व मोजक्या शब्दांतच सांगितलं होतं. ते म्हणाले होते, "विद्येविना मती गेली । मती-विना नीती गेली । नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले । इतके एका अविद्येने केले.

भारतातील दारिद्र्याचे, गुलामगिरीचे नेमके कारण म. फुले यांनी अशा तऱ्हेने जाणले, स्पष्ट केले व त्यादृष्टीने स्वतः प्रयत्नांची सुरुवात केली. या उक्तीतील मर्म भाऊराव यांना बरोबर उमगले. म. फुले यांच्या प्रयत्नांचे मोल समजले म्हणून तोच मार्ग चोखाळायचा असा त्यांनी निर्णय घेतला. खेड्यापाड्यांतील उपेक्षित, दुर्लक्षित आणि वंचित जनतेला शिक्षण देण्याचं काम त्यांनी आजन्म स्वीकारले नव्हे त्यांनी आपल्या आयुष्याचं ते एकमेव व्रतच मानलं.

स्वाभिमानी, स्वावलंबी मार्गाने शिकणाराच विद्यार्थी देशाला समृद्ध, संपन्न, समर्थ बनवेल; एकविसाव्या शतकाकडे जाणाऱ्या प्रगतीच्या वाटेवर या देशाला घेऊन जाईल व त्या दृष्टीने समाजाला योग्य ती दिशा देईल असा ठाम विश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला होता.

भगीरथाने ज्याप्रमाणे स्वतः तपस्या करून जनतेच्या कल्याणासाठी स्वर्गातली गंगा पृथ्वीवर भारत देशात आणली व जनतेपर्यंत

पोहोचविली त्याप्रमाणे कर्मवीर भाऊराव पाटलांनी जिद्दीने, नेटाने, चिकाटीने स्वतः प्रयत्न करून, स्वतः अनेक अडचणींना तोंड देत, स्वतःच्या संसाराकडे अक्षरशः पाठ फिरवून कुठल्याही गोष्टीची स्वतःसाठी अपेक्षा न ठेवता ज्ञानाची गंगा ग्रामीण भागात पोहोचवली. तिच्यातील ज्ञानजलाने वंचितांचे जीवन संपन्न बनवले. समर्थ बनवले. नीतिमान, चारित्र्यसंपन्न, त्यागी पिढी उभी केली. अगदी लहानातल्या लहान गावात शाळा सुरू करून ज्ञानाची गंगा अक्षरशः शेतकऱ्यांच्या, दलितांच्या, पीडितांच्या झोपड्यांच्या दारादारांत नेऊन पोहोचविली. म्हणूनच कर्मवीर भाऊराव पाटील हे 'आधुनिक युगातील भगीरथच' होत.

भाऊराव पाटील स्वतः कमी शिकले. पण आजच्या जगात शिक्षण हेच जीवनाचं खरं साधन आहे; ते नसेल तर समाजात माणसाला काहीच किंमत मिळत नाही. विद्येच्या तेजानेच माणसाला सौंदर्य प्राप्त होईल. विद्या हीच महादेवता आहे. कुठल्याही संकटातून तीच मानवाला मार्ग दाखवून मुक्त करील. विद्येमुळेच सुख, ऐश्वर्य या गोष्टी माणसाला प्राप्त होतील. विद्येअभावी मानवाची अवस्था पशूसारखी होईल ही गोष्ट भाऊरावांच्या मनाला पूर्ण पटली होती. शिक्षण हाच या काळातला कल्पवृक्ष आहे. इच्छिल ते फळ मानव फक्त शिक्षणानेच प्राप्त करू शकतो, हे त्यांनी जाणले होते.

❑ ❑ ❑

# पाटील मूळचे देसाई

कर्मवीर भाऊराव ऊर्फ आण्णा यांचे पूर्ण नाव भाऊराव पायगोंडा पाटील असे आहे. त्यांचे मूळ गाव सांगली जिल्ह्यातील वाळवा या तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक हे सांगितले जाते. भाऊरावांचे गाव हे जरी असले तरी त्यांच्या मूळ वंशजांचे गाव मात्र हे नाही.

भाऊरावांचे मूळ वंशज कर्नाटकातले. मुडबिद्री हे त्यांचे मूळ गाव. हे गाव सध्याच्या कर्नाटक राज्यात व पूर्वीच्या म्हैसूर राज्यात आहे. दक्षिण कन्नड या जिल्ह्यातील मंगलोर तालुक्यात हे गाव आहे. हे गाव जैन धर्मीयांचे प्रसिद्ध तीर्थस्थान आहे. त्यामुळे जैन यात्रेकरू या गावाला भेट देत असत. इथं हे घराणं देसाई या नावाने रहात होते.

या देसाई कुळातच भाऊराव यांचा जन्म झाला. पण त्यांच्या वंशाचे मूळ आडनाव बदलून भाऊरावांचे आडनाव पाटील झाले. पण देसाईंचे पाटील होण्यामागेही एक इतिहास आहे. एक घटना आहे.

सतराव्या शतकात विजापूरचा अदिलशहा याने प्रसिद्ध 'गोल घुमट' ही इमारत बांधावयास काढली. ह्या काळात कोणतंही मोठं बांधकाम म्हटलं की त्याच्या सुरुवातीस नरबळी देण्याची पद्धत चालू होती. अगदी भारतात इंग्रजी राजवट सुरू झाली तरीही ही पद्धत प्रचलित होती. पूल, धरणे बांधायची म्हटले की नरबळी लागायचाच. मग गोल घुमटासारखं विशाल, कलात्मक व एका

आवाजाचे सात आवाज ऐकू येणारी आवाजाची किमया करून दाखविणाऱ्या या इमारतीच्या बांधकामाच्या वेळी तरी अपवाद कसा काय होऊ शकेल?

गोल घुमट ही इमारत २०० फूट उंच व १४ फूट व्यासाची आहे. या भव्यदिव्य वास्तूचा पायाभरणीचा दिवस निश्चित झाला. यावेळी ज्योतिषाने सांगितले, 'ही वास्तू पूर्णत्वास जाऊन चिरंतन टिकावी असे वाटत असेल तर पायामध्ये जेठी जोडी-नवविवाहित बळी द्यावी. जेठी जोडी म्हणजे मुलाच्या घरात मुलगा मोठा व मुलीच्या घरची मुलगी मोठी. या दोघांचा विवाह झाला म्हणजे ते जेठे दांपत्य किंवा जोडी.

मग काय बादशहाने अशी जेठी जोडी शोधून आणण्याचे फर्मान काढले. बादशहाचे शिपाई गावागावांत जाऊन जेठी जोडीचा शोध घेऊ लागले. या फर्मानाची माहिती मुड बिद्रीच्या देसाई यांना मिळाली आणि ते घाबरूनच गेले. कारण त्यांच्या घरात अशी 'जेठी जोडी' होती. बादशहाच्या गुप्त हेरांमार्फत-शिपायांमार्फत जर हे बादशहाला कळले तर घरातले सर्वांचे आवडते असे दोन जीव फुकट जाणार होते. प्रसंग बाका होता. विजापूरच्या राज्यात रहाणं धोक्याचं होतं. तिथं राहून हे बळी टाळता येणार नव्हते. राजाची आज्ञा! तिला आव्हान कोण देणार ? आणि ती आज्ञा टाळणार तरी कशी ?

वेळ अधिक घालवण्यात अर्थ नव्हता. देसाई यांनी त्वरित मुडबिद्री गाव तसेच विजापूरच्या अदिलशाहीची सरहद्द सोडण्याचा निर्णय घेतला. एका अत्यंत काळोख्या रात्री बैलगाडी जोडून आपल्या काळ्या आईला-मातृभूमीला अखेरचे वंदन करून निरोप घेतला.

तेथून फिरत फिरत हे कुटुंब कोल्हापूरजवळ पन्हाळा या ऐतिहासिक गावी आले. ही घटना साधारण शिवशाहीच्या काळातली.



आपल्या काळ्या आईला वंदन करून त्यांनी अखेरचा निरोप घेतला.

गाव बदललं. उदरनिर्वाहाचं आजपर्यंतचं साधन म्हणजे शेती. पण या नव्या गावात शेती कुठली? चरितार्थ कसा चालवायचा? मग आपल्या उदरनिर्वाहासाठी देसाईंनी नवीन व्यवसाय निवडला. ते येथे वजनमापे विकण्याचा व्यवसाय करू लागले.

अत्यंत इमानदारीने, नेकीने, सचोटीने त्यांनी हा व्यवसाय केला. धंद्यात चांगला जम बसला. व्यापाऱ्यांत प्रतिष्ठा प्राप्त झाली. वजनमापाचा ते व्यापारच करत होते. व्यापार करणारे ते महाजन, म्हणून पन्हाळा येथे लोक त्यांना महाजन म्हणू लागले. अशा तऱ्हेने मुडबिद्रीचे देसाई पन्हाळ्यास महाजन झाले.

पण मूळ देसाई हे जैन असले तरी शेतकरीच होते. म्हणूनच त्यांना व्यापारापेक्षा काळ्या आईची - मातीची ओढ जास्त होती. 'पांढरी'च्या सेवेसाठी ते आसुसले होते. देसाईंचे हे तिघे भाऊ होते. मोठा भाऊ पन्हाळा येथेच व्यापार करीत राहिला. तो महाजनच राहिला. धाकटे दोघे भाऊ शेतजमीन घेण्याच्या दृष्टीने शोध घ्यावयास आपले घर सोडून दुसऱ्यांदा बाहेर पडले. गावोगाव जाऊन शेतजमिनीचा शोध घेऊ लागले.

ऐतवडे गावी आले. तेथील काळीभोर, सुपीक जमीन त्यांना आवडली. ऐतवड्याला केळीचं उत्पन्न तुफान होतं म्हणूनच त्याला केळीचं ऐतवडे म्हणायचे. या दोघा भावांनी तिथं जमीन घेतली. कष्टानं, जिद्दीनं व कर्तबगारीनं काळ्या आईची सेवा केली. जमीन-जुमला वाढवला, घर-दार बांधलं, शेती वाढवली, गावात प्रतिष्ठा वाढली. त्यामुळे दोघांतील मोठ्या भावाकडे ऐतवड्याची पाटीलकी आली. या ऐतवड्यातच आता मुडबिद्रीचे मूळचे देसाई, पन्हाळ्याचे महाजन-पाटील झाले. केळ्याच्या ऐतवड्याला जैन घराण्याचा पाटील मिळाला.

दोघे भाऊ येथे अतिशय आनंदाने, सुखा-समाधानाने रहात होते. पण नियतीच्या मनात आणखी काही वेगळंच होतं.

येळगाव इथे मराठा पाटील होता. ऐतवड्यास थोरल्या भावाला पाटीलकी मिळाली. पण धाकट्या भावाला या पाटीलकीच्या आश्रित रहाणे पटेना. तो स्वाभिमानी होता. कर्तबगार होता. त्याने स्वतःचे कर्तृत्व दाखविण्याचा निर्णय घेतला. ऐतवड्याला त्याने रामराम ठोकला. येळगावला आला. येळगाव हे सातारा जिल्ह्यात कराड तालुक्यात आहे. येळगावच्या मराठा पाटलास मूल नव्हते. वंशाला दिवा हवा. तशात हा पाटील मुलगा गावात आला. झालं. पाटलाने त्यालाच दत्तक घेऊन टाकले. अर्थात या दत्तक पित्यानंतर त्यालाच येळगावची पाटीलकी मिळाली.

अशा तऱ्हेने मोठा भाऊ पन्हाळ्यास लिंगायत पाटील झाला. मधला भाऊ ऐतवड्यास जैन पाटील झाला तर धाकटा भाऊ येळगावला मराठा पाटील झाला.

भाऊरावांच्या घराण्यात अशा तऱ्हेने नियतीनेच धर्मबंधने व जातिबंधने यांना मूठ-माती दिली होती.

❑❑❑

# वंशवेल

भाऊरावांचे वंशज नेमगोंडा पाटील हे करवीरच्या जैनपीठाचे प्रमुख होते. त्यांनी इ. स. १८२० साली समाधी घेतली. करवीर येथे 'जिनसेन भट्टारक पट्टाचार्य' हे धर्मपीठ आहे. याची गादी मानाची समजली जाते. नेमगोंडा यांनी दिगंबर मुनींची दीक्षा घेऊन ते संन्याशी झाले व त्यांच्या व्रतस्थपणातून त्यांना या गादीचा मान मिळाला होता. त्यांनी कृष्णा नदीकाठी भिलवडी येथे सल्लेलखन विधीने समाधी घेतली.

नेमगोंडा यांना एकच मुलगा होता. त्याचे नाव शांतगोंडा. तो नावाप्रमाणेच शांत स्वभावाचा होता. मनमिळाऊ वृत्ती, चारित्र्य-संपन्नता, शुद्ध आचरण व त्यागी भावना या गोष्टींमुळे त्यांनासुद्धा 'जिनसेन' आचार्यपदाचा मान मिळाला. त्यांनी या मठाची (पीठाची) खूप भरभराट केली. इ. स. १८५४ साली सांगली जिल्ह्यात नांदणी गावी त्यांचे देहावसान झाले.

त्यांच्यानंतर या पीठाच्या कार्यात कोणी रस घेतला नाही. ते संसारातच स्थिर राहिले.

देवगोंडा ज्योतिगोंडा पाटील हे भाऊरावांचे आजोबा. त्यांनी धर्मगुरूची दीक्षा घेतली नव्हती तरी पण ते धार्मिक कार्यात व सामाजिक कार्यात लक्ष घालीत. नांदणी येथील मठासाठी ते स्वतःची सेवा उपलब्ध करून देत. ते स्वतः निरक्षर होते. पण रुबाबदार व्यक्तिमत्त्व व ऐटबाज रहाणीमुळे ते निरक्षर असावेत असा संशयसुद्धा कोणाला येत नसे.

एकदा एका सामाजिक भांडणात निवाडा करण्यासाठी पंच म्हणून त्यांना बोलाविले. ते गेले. पण जाताना आपल्या नात्यातील वयानं मोठ्या पण लिहिता येत असणाऱ्या व्यक्तीस नेले. सर्व घटना समजावून घेऊन योग्य निवाडा केला. कागदावर लिहिला. पंच म्हणून सही करण्याची वेळ आली तेव्हा ते म्हणाले, "समोर वडीलधारी व्यक्ती असताना धाकट्याने सही करणे म्हणजे त्यांचा अपमान होय. मी सही करू शकत नाही." शेवटी त्या वडीलधाऱ्या व्यक्तीची सही घेतली गेली. वेळ तर बेमालूमपणे मारून नेली. पण आपल्या निरक्षरतेची बोच मनात चांगलीच घर करून गेली. देवगोंडांनी आपला मुलगा पायगोंडालाही शिक्षण सोडून शेतीत घातले होते. या घटनेनंतर ते नांदणीहून ऐतवड्याला आले. पायगोंडा शेतात कामाला गेला होता. त्याला ताबडतोब बोलावून घेतले व शिक्षणासाठी आपल्या गावापासून वीस कि. मी. अंतरावरील आष्टे या गावी पाठविले.

देवगोंडा पाटील डोक्याला भला मोठा रुमाली पटका बांधत. तो सर्वांचे लक्ष वेधून घेत म्हणून लोक त्यांना रुमालगोंडा पाटील असेही म्हणत असत.

पायगोंडा हे देवगोंडांचे पुत्र व भाऊरावांचे वडील. आष्टे येथे नातेवाइकाच्या घरी राहून ते इयत्ता सातवी पास झाले. सातवीची परीक्षा पास होणारा पायगोंडा हा त्यांच्या समाजातील पहिलाच मुलगा होता. त्यांचे वय त्यावेळी २० वर्षे होते. ते वयाच्या विसाव्या वर्षीच रेव्हेन्यू खात्यात नोकरीस लागले. ते अत्यंत सज्जन व पापभीरू होते. सत्य, अहिंसा व सदाचारी आचरणाचे होते. वृत्तीने पुरोगामी पण

अंतःकरणाने उदार होते. निर्व्यसनी व कर्तव्यदक्ष होते. तसेच ते अत्यंत काटकसरी होते.

कोल्हापूर संस्थानातील कुंभोज गावी जिनगोंडा पाटील होते. त्यांची एकुलती एक मुलगी गंगुबाई उपवर झाली होती. पायगोंडा शिकलेला, शेतीवाडी असलेला, सरकारी नोकरी करणारा मुलगा त्यांना पसंत पडला व त्यांनी आपल्या गंगुबाईचे लग्न त्याच्याशी लावून दिले.

पायगोंडा पाटील सेवावृत्तीचे होते. एकदा बुधगाव येथे चांगल्या जातीच्या आंब्यांची रोपे तयार केली. ती कुणीही विकत घेतली असती. पण पैशांचा मोह सोडून त्यांनी शेतकऱ्यांना मोफत दिली व आंब्याची लागवड करण्यास सांगितले.

ते चिकित्सक वृत्तीचेही होते. त्यांनी जयसिंगपूर येथे एक जागा विकत घेतली. ती जागा मुसलमानांच्या दफनभूमीची आहे असे शेजारच्या व्यक्तीने सांगितले. पायगोंडांनी मूळ कागदपत्रे मागविली. वारुळे खोदली. जमीन सपाट केली. खांदताना जमिनीतून निघालेली हाडे माणसांची नसून जनावरांची आहेत हे सिद्ध केले.

त्यांच्या ठायी स्वाभिमान व अढळ निश्चय होता. एकदा मामलेदारांनी रागाच्या भरात पायगोंडांचा अपमान केला. नोकरी का सोडत नाही म्हणाले. लगेच त्यांनी आपला राजीनामा सादर केला. मामलेदाराला खूप पश्चात्ताप झाला. कर्तबगार माणूस त्याला सोडायचा नव्हता. राजीनामा मागे घेण्यासाठी पायगोंडांना परोपरीने विनवले पण त्यांचा



पत्नीच्या बोलण्यावरून भाऊरावांच्या वडिलांनी चिलीम कायमची फेकली.

निश्चय ढळला नाही. राजीनामा मागे घेतला नाही. आपल्या चुकीचे परिमार्जन करण्यासाठी मामलेदाराने त्यांचा मुलगा बळवंतराव यास नोकरीस लावून घेतले.

ते चिलीम ओढत असत. एकदा त्यांच्या पत्नी सौ. गंगुबाईंनी त्यांच्या चिलमीचा उद्धार केला. त्या दिवशी त्यांनी जी चिलीम फेकून दिली ती कायमची. पुन्हा कधीच तिला हात लावला नाही.

पायगोंडा व गंगुबाई या दांपत्याला चार मुले व दोन मुली झाल्या. पहिला भाऊराव, दुसरा तात्यासाहेब, तिसरा बळवंतराव व चौथा नरेंद्र. मुलींपैकी एकीचं नाव द्वारका व दुसरीचं तारूआक्का.

भाऊच्या आई गंगुबाई या सहनशील, दयाळू, विनयशील होत्या. देवधर्म, पूजाअर्चा नियमानं करत असत. त्या मुलांचे लाड करत. त्यांना गोष्टी सांगत असत. त्यांच्या शंकाचं निरसन करीत असत.

आपल्या पूर्वजांचे व आईवडिलांचे हे सर्व गुण कळत नकळत भाऊरावांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कार करत गेले. या सर्व गुणांचा समुच्चय असलेलं भाऊरावांचं व्यक्तिमत्त्व घडलं गेलं. २२ सप्टेंबर १८८७ हा भाऊरावांचा जन्मदिवस.

❑ ❑ ❑

## बालपणीचे संस्कार


पायगोंडा सरकारी नोकरीत होते. त्यांची सारखी बदली व्हायची. कधी घाटात-रानातही रहावे लागायचे म्हणून त्यांनी सौ. गंगुबाईंना तिच्या माहेरी म्हणजे कुंभोजलाच जास्त काळ ठेवले.

अर्थात सर्वसामान्यपणे मुले आईजवळच जास्त असतात. तीच त्यांचे लाड, कोड-कौतुक करते. भाऊरावांनाही आईचाच सहवास जास्त लाभला. आई त्यांना गोष्टी सांगे. त्यांच्या शंकांचं निरसन करी.

गंगुबाई गोऱ्या होत्या. हाडापेरानं मजबूत होत्या. धष्टपुष्ट होत्या. कर्तबगार होत्या. त्यांचा स्वभाव महत्त्वाकांक्षी व करारी होता. त्या स्वाभिमानी होत्या. घरातील सर्व कामे त्या स्वतः करीत. बाजारहाट करीत. मुलामुलींची लग्ने, देणे-घेणे त्या स्वतःच पहात असत. त्या सहनशील, दयाळू व विनयशील होत्या. त्या देवधर्म, पूजाअर्चा नियमानं करत असत. आईचे हे संस्कार भाऊरावांवर आपोआपच घडत गेले.

भाऊला अभ्यासात विशेष रस वाटत नसे. त्याला अवांतर वाचनच आवडू लागलं. कुठंही चांगलं पुस्तक दिसलं की तो वाचायला आणत असे. छत्रपती शिवाजी महाराजांची धाडसी वृत्ती, निर्भयपणा, त्यांचा पराक्रम, भवानीदेवीवरची निष्ठा, आईवरची अपार श्रद्धा, मित्रांवरील विश्वास या सर्व गोष्टी वाचताना मधूनच भाऊरावांच्या मनावर बिंबल्या होत्या.

वडील पायगोंडा अंगाने सडपातळ, रंगाने सावळे होते. त्यांचा स्वभाव शांत व प्रेमळ होता. ते कोणाच्या अध्यातमध्यात पडत नसत. नोकरी व घर या पलीकडे त्यांचे कुठेच लक्ष



[illegible] सदैव नम्र असत.

जात नसे. ते नेहमी स्वच्छ रहात. साधे पांढरे कपडे वापरीत. धोतर, शर्ट, डोक्याला रुमाल (पटका) व अंगावर उपरणे असा त्यांचा पोषाख असे.

नोकरीवर नेहमी पाच मिनिटे अगोदरच जात व उशिरा परत येत. कोणाचे बोलून घेत नसत. त्यांचा स्वभाव स्वाभिमानी व करारी होता. टापटिपीची त्यांना आवड होती. ते काम वेळच्या वेळी व चोख करीत असत. खरेदी, बाजारहाटाकडे लक्ष देत नसत. ती जबाबदारी त्यांनी पत्नीवर टाकली होती. पगार झाला की ते पत्नीच्या हातात आणून देत असत.

आई-वडिलांच्या या गुणांची देणगी भाऊरावला आपोआप मिळत गेली. रोज सकाळसंध्याकाळ भाऊ स्नानानंतर आई-वडील व घरातील थोरामोठ्यांच्या पाया पडत असे. कामासाठी घराबाहेर पडतानाही तो या सर्वांना नमस्कार करीत असे.

भाऊरावाला स्वाभिमान, करारीबाणा व सेवावृत्ती आपल्या वडिलांकडून मिळाली. कणखर शरीरयष्टी, अलौकिक नीतिधैर्य, अविचल सत्यनिष्ठा इ. गुणांचा वारसा माता गंगुबाईकडून मिळाला. साधी रहाणी, सार्वजनिक काम करण्याची वृत्ती व कष्ट करून माळरानाचे नंदनवन उभे करण्याची जिद्द हे गुण वडील पायगोंडा यांच्यापासून मिळाले होते.

भाऊरावांची रहाणी साधी होती. खादीचे धोतर नेसत. ते स्वतः हाताने धूत असत. नेहरूशर्ट, डोक्यावर काही नाही, पायात काही

नाही. काही दिवस खांद्यावर घोंगडी घेत. नंतर घोंगडी गेली व हातात काठी आली. झुणका, भाकर, ताककण्या हे त्यांचे जेवण होते. ते पूर्ण निर्व्यसनी होते. सुरुवातीला चहासुद्धा पीत नसत, दूध नियमित पीत असत. रोज न चुकता सूर्यनमस्कार घालायची सवय त्यांना होती. त्यामुळे त्यांची सुदृढ प्रकृती अधिक सुडौल व बळकट झाली.

सत्याण्णा हा भाऊंच्या मामांचा मित्र. दलित स्त्रीवरील अत्याचाराने बंडखोर बनला. सत्यनिष्ठा, उपेक्षिताबद्दल करुणा, अन्यायाची चीड, न्यायाची चाड या त्याच्या स्वभावातील गोष्टी त्याच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या भाऊला सहजतेने शिकायला मिळाल्या.

भाऊराव दीडदोन वर्षांचे असताना त्यांचे वडील सातारा - पंढरपूर मार्गावर पीलीव घाटात झोपडी बांधून रहात होते. रात्रीचे तेथे लांडगे येत. झोपडीला धडका मारीत. नखांनी कुडाला ओरबाडीत. पण भाऊची आई धीट. ती घाबरत नसे. हाच धीटपणा, निर्भयपणा, बेदरकारपणा भाऊंच्या मनावर कोरला गेला.

भाऊराव दहा वर्षांचे होते. विटे येथे मुक्काम होता. एकदा तेथे त्यांना साप चावला. विष उतरण्यासाठी त्यांना कडूलिंबाचा रस पाजला. थोड्या वेळाने विष उतरले. नशीब बलवत्तर. पण जणू समाजातले सर्व हलाहल पचविण्याची शक्तीच या प्रसंगाने त्यांना दिली.

वडिलांच्या नोकरीनिमित्त भाऊरावांना खूप भटकावे लागले. त्यांच्या वडिलांचा संबंध सर्व थरांतील लोकांशी यायचा. मजूर, तळागाळातील लोकांशी जास्त संबंध असायचा. साहजिकच त्यांची दुःखं, अडीअडचणी, त्यांची उपासमार, सावकाराकडून होणारी लूटमार, पिळवणूक पाहिली. दारिद्र्य, हलाखीची जाणीव झाली. हे सारं बघून भाऊंचं मन पिळवटून निघायचं. ❑❑❑

## बालपण व शिक्षण

भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण सुरुवातीस दोन वर्षे कुंभोज येथेच झाले. पण त्यांचा हूडपणाच जास्त होता. या वयात ते कुंभोजजवळ असलेल्या बाहुबलीचा डोंगर एका दमात चढून जात. वारणा नदीच्या डोहात तासन् तास पोहण्याचा त्यांना छंद होता.

त्यांच्या वडिलांच्या सारख्या बदल्या होत असत म्हणून पुढील शिक्षणासाठी दहिवडी, विटे या गावी त्यांचे नाव शाळेत घातले गेले. पण केवळ नाव हजेरीवर असायचे. तसा त्यांचा शाळेशी संबंध फारच कमी यायचा. खेळ व बंडखोरी यांतच त्यांचा वेळ जायचा. त्यांच्या भोवती मित्रांचा मोठाच घोळका कायम असायचा. या सर्व एक वयाच्या मित्रांचे ते नेतेच असायचे. जसा गोपाळांचा कृष्णच.

विटे येथे पायगोंडा रहात असताना ठाणावाला नावाचे पारशी गृहस्थ शेजारी रहात होते. त्यांना अपत्य नव्हते. भाऊंचा त्यांना लळा लागला. मग भाऊला इंग्रजी शिकविण्यासंबंधी त्या गृहस्थांनी पायगोंडाकडे

हट्टच धरला. मग विट्यालाच खाजगीरीत्या दत्तोपंत जोशींकडे भाऊरावांनी इंग्रजीचे प्राथमिक धडे गिरविले.

१९०२ साली इंग्रजी शिक्षणासाठी त्यांना कोल्हापूर येथे पाठविले. त्यासाठी विटे ते किर्लोस्करवाडी हा २५ मैल प्रवास पायी करून मग रेल्वेने कोल्हापूरला जावे लागले. १९०२ ते १९०७ या काळात कोल्हापूर येथेच जैन बोर्डिंगमध्ये राहून राजाराम हायस्कूलमध्ये ते शिकण्यासाठी जात असत.

परंतु प्रारंभी शाळेकडे फिरवलेली पाठ, खेळणे, दांडगाई यांत घेतलेला रस, पोहणे, हिंडणे यांत गेलेला वेळ यामुळे प्राथमिक शिक्षणाचा पाया कच्चा राहिला. त्यामुळे हायस्कूलमध्ये शिक्षणाची फारशी प्रगती होऊ शकली नाही. अभ्यासेतर कार्यक्रमात ते आघाडीवर असत. खेळ, कुस्ती, पोहणे यांत पटाईत होते. इंग्रजी चौथीत राजाराम हायस्कूलमध्ये प्रवेश घेतल्यापासून नियमित उपस्थिती, उत्तम चारित्र्य, आज्ञाधारकपणा आणि वाटेल तेवढे शारीरिक कष्ट करण्याची तयारी यामुळे सर्वच शिक्षकांना भाऊरावांबद्दल प्रेम वाटू लागले.

खाजगीत इंग्रजी दुसरी ते चौथीचा अभ्यास करून भाऊंनी पाचवीत राजाराम हायस्कुलात प्रवेश केला. साधा लांब सदरा व डोक्याला भैय्यासारखी टोपी या पोषाखात प्रवेश करताच सारी मुलं हसली होती. पुढे भाऊंनी आपल्या पोषाखात थोडा थोडा बदल घडवून आणला.

हायस्कूलमध्ये भाऊराव उत्तम फुटबॉलपटू म्हणून प्रसिद्ध होते. रोज संध्याकाळी खासबाग मैदानावर ते फुटबॉलचा सराव करत असत.

अर्थात ते एका वर्गात नापास कधीच झाले नाहीत. कशाबशा मार्कांनी ते वरच्या वर्गात जातच होते.

याच शाळेत भाऊरावांच्या वर्गात बाळासाहेब खानविलकर नावाचा विद्यार्थी होता. तो छत्रपती शाहू महाराजांच्या नात्यातला होता. त्याला दुसरे मित्र नव्हते. भाऊंशी त्याची चांगली गट्टी जमली.

भाऊंच्या बंडखोरपणामुळं जेव्हा भाऊंना जैन बोर्डिंगमधून काढून टाकलं तेव्हा याच बाळनं त्याच्या वडिलांच्या परवानगीनं भाऊंना आपल्या घरी रहायला नेलं होतं. या वेळी भाऊराव जेवायला मात्र गावातील जैन खानावळीत जात असत. जेवायला जाताना येताना बाळासाहेब त्यांना आपली बग्गी देत असत.

राजवाड्यात बाळासाहेबांच्या घरी भाऊराव रहायला आल्यावर भाऊंना छत्रपतींचा जास्त परिचय झाला तसेच हा धिप्पाड, चुणचुणीत मुलगा बाळबरोबर सतत पाहून छत्रपतींच्या नजरेत भरला होता.

❑❑❑

## छत्रपतींनी हेरले !

भाऊराव खानविलकरांकडे रहायला आले. बाळबरोबर असणारा हा मुलगा शाहू महाराजांच्या नजरेस पडला. निर्व्यसनी, शांत स्वभावाचा, विनयी भाऊराव भरदार छाती, तेजस्वी डोळे, उंचापुरा बांधा, चालण्यातील डौल यामुळं छत्रपतींच्या डोळ्यांत भरला.

छत्रपती शाहू पहिलवानांचे चाहते होते. काही निवडक पहिलवानांना त्यांनी आश्रय दिला होता. त्यांची खाण्यापिण्याची, व्यायामाची, खुराकाची, आखाड्यात कुस्ती करण्याची, फडावर कुस्ती करण्याची इ. सर्व व्यवस्था उत्तम तऱ्हेने ठेवली होती.

भाऊराव कोण, कुठला, काय याची त्यांनी आस्थेने चौकशी केली. भाऊरावला संधी मिळाली तर पुढे तो चांगला पहिलवान होईल व नाव गाजवेल असं छत्रपतींना वाटलं. आमच्या नव्या आखाड्यात येशील का ? असं त्यांनी भाऊरावांना विचारलं.

मग काय भाऊला पाहिजे होतं तेच मिळालं. त्याने अतिशय आनंदाने होकार दिला. थोड्याच दिवसांत तो आखाड्यात जाऊ लागला. निरनिराळे व्यायामप्रकार शिकू लागला. जोर, बैठका, मल्लखांब, कुस्त्यांचे डावपेच, लाठी-काठी इ. सर्व प्रकारचे शिक्षण उत्तम शिक्षकांकडून मिळू लागलं.

व्यायाम झाल्यावर भरपूर दूध प्यायला मिळू लागलं. यामुळं भाऊचं मूळचं मजबूत असलेलं शरीर अधिक घोटीव व चिवट बनलं. तो अधिकच धिप्पाड दिसू लागला. उत्तम पहिलवान झाला. बाहेरगावी जाऊन कुस्त्या करून जिंकून येऊ लागला. छत्रपती कौतुक करायचे. प्रोत्साहन द्यायचे.

शालेय शिक्षणातली उणीव मल्लविद्येने भरून निघाली होती. भाऊरावांच्या मनात भरपूर आत्मविश्वास निर्माण झाला होता. आता आपण नवा व्यवसाय करावा असा विचार मनात आला आणि त्यांनी छत्रपतींचा निरोप घेतला. ❑❑❑

## सत्यप्पाने मार्ग दाखविला

सत्यप्पा बेरड हा भाऊरावांचा आणखी एक मित्र. खूप धाडसी. भीती त्याला शिवतच नव्हती. तो भाऊच्याच वयाचा. घरी एकटाच. नात्यागोत्याचं कुणीच नव्हतं. निदान त्याला तरी माहीत नव्हतं.

तो मजबूत, धडधाकट शरीराचा होता. चांगला उंचापुरा होता. त्याची नजर भेदक होती. तो रागीट स्वभावाचा होता. एकदम पहाणाराला तो खूप क्रूर वाटत असे. पण मनातून तो खूप प्रेमळ होता.

तो गरिबांना नाडून, लुबाडून, पिळून श्रीमंत झालेल्या लोकांना लुबाडायचा. मिळालेल्या संपत्तीतला एक पैसाही तो स्वतःसाठी वापरत नसे. दिवसभर कुठेतरी मोलमजुरी करून तो आपल्या उदरनिर्वाहाची सोय करी.

सवड मिळताच आजूबाजूला फेरफटका मारून यायचा, गरिबांना मदत करायचा, अस्पृश्यांना जेवू घालायचा, आजाऱ्यांना औषधपाणी द्यायचा. यासाठी धनिकांकडून काढलेला पैसा उपयोगात आणायचा.

या गुन्ह्याबद्दल तो हसतमुखाने शिक्षा भोगी. तुरुंगात तो इतका छान वागे की सर्वांनाच नवल वाटे. पण बाहेर पडताच हा उद्योग पुन्हा सुरूच व्हायचा.

असाच एकदा तो तुरुंगात होता. शिक्षेचं काही सांगता येत नव्हतं. कदाचित आयुष्याचा शेवटही होणार होता. शेवटी त्यानं भाऊला निरोप पाठवून भेटीला बोलावून घेतलं. या भेटीत सत्यप्पाने भाऊला स्पष्ट बजावलं, 'माझं काय व्हायचं असेल ते होवो पण गरिबांसाठी तुला जे काही करता येईल ते आजन्म कर.'

शेवटी सत्यप्पाला फाशी झाली. शेवटची इच्छा म्हणून त्यानं भाऊच्या चपला मागून घेतल्या. भाऊनं त्या दिल्या. जेलरने घालण्याची परवानगी दिली. भाऊ त्या दिवसापासून अनवाणी झाला.

□□□



साश्रू नयनांनी अनवाणी जाणाऱ्या भाऊरावांकडे पहाणारा सत्यप्पा

२६४२
३१।३।९४
बा।वा।

# अस्पृश्यांबद्दल कळवळा

भाऊराव १०-१२ वर्षांचे असतानाची ही गोष्ट आहे. ते आजोळी कुंभोजला आले होते. आजोबांनी नवा कोट दिला होता. तो घालून बाहेर मिरवत असताना गावच्या महाराचा मुलगा आला. भाऊनं विचारलं, 'तुझा कोट कुठंय ?'

'आमाला कुटला आलाय कोट? कोण देतंय आमाला' तो म्हणाला. बस्स ! मग तो नको नको म्हणत असता दिला त्याच्या अंगावर कोट टाकून. आता विटाळलेला कोट परत कसा द्यायचा ? गुपचुप कोट घरी न्यावा लागला त्याला.

भाऊच्या मनातली त्यागाची व करुणेची बीजं अशी लहान वयातच दिसत होती.

कोल्हापूरला शिकत असतानाचा प्रसंगही असाच आहे. छत्रपतींच्या प्रेरणेने मिस क्लार्क वसतिगृह सुरू केले होते. हे वसतिगृह हरिजन मुलांसाठीच होते. त्याच्या उद्घाटनाला भाऊ जाऊन आला. वसतिगृह-प्रमुखांनी अंघोळ करून आत येण्यास सांगितले. भाऊ म्हणाला, 'मी सकाळी अंघोळ केली आहे. आता परत करणार नाही' व खरेच परत अंघोळ केली नाही. जाती, धर्म, अंधश्रद्धा, घातक रूढी, परंपरा मोडण्याची वृत्ती व साहस अशा प्रसंगांतून स्पष्ट होते.

भाऊराव कराडला रहात असतानाचा प्रसंग. तेव्हा गावात पाणी भरण्यासाठी जाती-जातींचे आड वेगवेगळे होते. भाऊराव ब्राह्मण आळीत रहात. भाऊरावांच्या आईचा नंबर आला तरी लोक पाणी भरू देईनात. शेवटी त्या भल्या पहाटे उठून पाणी भरू लागल्या. भाऊला हा अन्याय सहन झाला नाही. जात-पात गाडण्याचा त्याने निश्चय केला. एके



सर्वांना पाणी मिळवून देणारे भाऊराव

दिवशी त्याने आईच्या हातातली घागर हिसकावून घेतली. ब्राह्मण विहिरीवर गेला. सरळ गर्दीत घुसून पाणी घेऊन घरी आला.

त्याच दिवशी दुपारी सर्व जातिधर्मांची मित्रमंडळी जमवली. हा घोळका घेऊन भाऊ ब्राह्मण विहिरीवर आला. विहिरीमधून पाणी काढले. सर्व मुलांना दिले. सर्वजण पोटभर पाणी प्यायले. परत निघून गेले. सारी ब्राह्मण माणसं तिथं गोळा झाली होती. सारेजण नुसते पहातच राहिले. करतात काय बिचारे !

अशा प्रसंगातून साहसाबरोबर निर्धार आणि सामाजिक चळवळीच्या नेतृत्वाचे गुण प्रकट झाले होते.

असेच एकदा त्याने पाहिले. स्पृश्यांच्या आडावर लोक पाणी भरत होते. अस्पृश्य लोक लांब उभे राहून पाण्याची याचना करत होते. तासन् तास झाले तरी त्यांना कोणी पाणी देईना. भाऊच्या मनात त्यांच्याबद्दल कळवळा आला. विषमतेची चीड उत्पन्न झाली. तो सरळ झाडावर गेला. एकाच्या हातातली बादली हिसकावून घेतली. सर्व हरिजन लोकांना पाणी दिले आणि सरळ दणके देऊन रहाट मोडला आणि दिला विहिरीत टाकून, "अस्पृश्यांना पाणी देत नाही काय? आता प्या पोटभर पाणी" असं म्हणत निघून गेला. सारे लोक हात चोळत बसण्या खेरीज काहीच करू शकले नाहीत.

१९०७ सालची गोष्ट. भाऊचे आईवडील तेव्हा इस्लामपूरला होते. सुट्टीत भाऊ त्यांना भेटायला आला. सहज फिरत फिरत शाळेकडे गेला. पावसाचे दिवस होते. एक मुलगा कुडकुडत बाहेर बसून शिकत असलेला पाहिला. त्याचं नाव ज्ञानदेव घोलप. तो हरिजन होता त्यामुळे गुरुजी त्याला वर्गात घेऊ शकत नव्हते.

भाऊ त्याला घरी घेऊन आला. घरात बसून जेवू घातले. तो मुलगा हरिजन आहे हे कळल्यावर आईने भाऊला फुंकणीने मारले. पण भाऊने हट्ट सोडला नाही. शेवटी आई या मुलाला दुसऱ्या दिवशी जेवू घालायला तयार झाली. पण बाहेर बसूनच. मग भाऊसुद्धा त्याच्या पंक्तीला बाहेर बसून जेवला. पुढे भाऊच्या कार्यातून आईचे परिवर्तन झाले हे वेगळे.

दुसऱ्या दिवशी भाऊराव त्याला घेऊन कोल्हापूरला आले. मिस क्लार्क वसतिगृहात त्याला प्रवेश मिळवून दिला. तो मुलगाही जिद्दी. शिकला. कर्तबगार झाला. आमदार झाला. अस्पृश्यांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी 'मूकनायक' नावाचे नियत-कालिक त्याने चालविले. या घोलपांनी आपली सारी मुलं रयत शिक्षण संस्थेच्या वसतिगृहात ठेवूनच शिकविली.

❑ ❑ ❑

# वसतिगृहातील बंडखोरी

साहस जणू भाऊच्या रक्तातच होते. अगदी लहानपणी कुंभोजला सारी मुलं नदीत डुंबत होती. तेवढ्यात सुसर येताना दिसली. सारी मुलं पटापट पळाली. पण भाऊ तिथंच पाय रोवून उभा. नदीवरच्या माणसांनी आरडाओरडा करून त्याला ओढून बाहेर काढले.

अशा साहसाच्या जोडीला त्याच्यावर

कोल्हापूरला छत्रपती शाहूंच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडली. शाहू महाराजांच्या प्रवृत्तीचे, शांत स्वभावाचे, परोपकारी वृत्तीचे, गुणांचे चाहते. न्यायाची चाड व अन्यायाची चीड असलेले होते. स्पृश्य, अस्पृश्यता ते मानत नसत. अस्पृश्यांना समाजात मानानं वागवावं, त्यांची गरीबी दूर व्हावी, त्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा व्हावी ही त्यांची इच्छा. ते सर्वच जातींशी सरमिसळ वृत्तीने वागत. ते अत्यंत नम्र होते. गरिबांबाबत ते खूपच कनवाळू होते. त्यांचा स्वभाव निगर्वी होता.

भाऊंच्या मनात याच भावना सुप्त होत्या. छत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावानं त्या उफाळून वर आल्या. त्यांच्यात बंडखोरवृत्ती होती. शिकत असतानाच ती दिसून आली.

ते ज्या जैन बोर्डिंगमध्ये राहत होते तिथला एक नियम होता. जेवणापूर्वी दाढी करायची. पण भाऊने पाहिले, वसतिगृह-प्रमुखच हा नियम पाळीत नाहीत. मग एकदा त्यानंही निमय मोडला. जेवणानंतर दाढी केली. वसतिगृह-प्रमुख रागावले. त्यांनी भाऊला शिक्षा केली. पण भाऊ घाबरला नाही. केलेला दंड भरला नाही.

या वसतिगृहात जेवताना मुलांना सोवळे नेसावे लागे. हे सोवळे अस्वच्छ असे. भाऊने पाहिले. वसतिगृहाचे आचारी रात्री हे सोवळे अंथरून त्यावर झोपतात. भाऊने हे अस्वच्छ सोवळे नेसण्यास नकार दिला. त्याबद्दल त्यांना जेवण दिले गेले नाही. भाऊसुद्धा काही बोलला नाही. रात्री सर्वजण झोपल्यावर स्वयंपाकगृहात गेला. झाकून ठेवलेले अन्न घेतले. पोटभर जेवला. पण अशा बंडखोरीमुळेच भाऊरावाला वसतिगृहातून काढून टाकण्यात आले.

❑❑❑

## भाऊरावांचा सत्यबाणा

भाऊरावांचे जैन बोर्डिंग सुटले. आता ते खानविलकरांच्या इथे सरकारातच रहात होते. एकदा बाळासाहेब खानविलकर, भाऊराव व पाच-सहा मित्र स्टेशनकडे फिरावयास गेले. या मित्रांपैकी काहीजण विड्या पीत होते. शाहू महाराजांनी बग्गीतून जाताना हे पाहिलं. या साऱ्याजणांना वाड्यावर बोलावून घेतले. विड्या कोण ओढत होते म्हणून विचारले.

प्रत्येकजण मी सोडून बाकीचे ओढत होते असे म्हणाला. प्रत्येकजण आपला दोष दुसऱ्यावर ढकलू पहात होता. महाराजांनी भाऊरावाला विचारले. 'मी मात्र विडी ओढत नव्हतो' एवढेच ते म्हणाले. महाराजांना उत्तर आवडले. भाऊराव निर्व्यसनी होतेच, पण सत्य तेच बोलणे हा त्यांचा बाणा होता. उपजत स्वभाव होता.

दुसरी गोष्ट १९१४ सालची आहे. भाऊरावांनी कोल्हापूर सोडले होते. आपले घरही सोडले होते. त्यावेळी ते साताऱ्यात रहात होते. इकडे कोल्हापुरात जैन बोर्डिंगचे प्रमुख लठ्ठे व त्यांचे विरोधक असे दोन गट पडले होते. लठ्ठेविरोधकांनी त्यांना बदनाम करण्यासाठी एक कुभांड रचले.

१४ फेब्रुवारी १९१४ च्या रात्री टाऊन

हॉल बागेतील राजा एडवर्ड व व्हिक्टोरिया राणी यांच्या पुतळ्याच्या तोंडास डांबर फासले. पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर हे कृत्य कोणीतरी केले. त्याचा फायदा लठ्ठे-विरोधकांनी घेऊन लठ्ठे यांच्यावर संशय व्यक्त केला व सरकारला त्यांच्यावर खटला भरण्यास सांगितले. सरकारलाही ते हवेच होते.

या विरोधकांपैकी श्री. निटवे यांनी भाऊरावांना तार करून कोल्हापूरला बोलावून घेतले. ते म्हणाले, 'भाऊ, तुला लठ्ठेनी बोर्डिंगमधून हाकलले. तुझ्या आयुष्याचे नुकसान केले. आता चांगली संधी आली आहे. त्यांच्या विरोधी खोटी साक्ष दे. चांगला बदला घे.'

पण भाऊने स्पष्ट सांगितले, "श्री. लठ्ठे माझे गुरुजी आहेत. त्यावेळी त्यांनी जे जे केले ते ते त्यांच्या दृष्टीने माझ्या कल्याणासाठी असेल. मी माझ्या गुरूच्या विरोधात खोटी साक्ष देणार नाही."

झाले. आता नवीन योजना लठ्ठे-विरोधकांनी तयार केली. त्या दिवशी भाऊरावांना प्रेसमध्ये मुक्कामास ठेवले. स्वतःच्या प्रेसला स्वतःच्या हातांनीच छोटी आग लावली व भाऊरावनं प्रेसला आग लावल्याची फिर्याद श्री. निटवे यांनी पोलिसात दाखला केली. भाऊरावांना अटक झाली. यातून सुटायचे असेल तर लठ्ठेविरुद्ध साक्ष दे असे सांगण्यात आले. यासाठी त्यांचा शारीरिक, मानसिक खूप छळ करण्यात आला. या छळास कंटाळून दोन वेळा भाऊरावांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला होता. पण महाराष्ट्राचे दैव बलवत्तर म्हणून दोन्ही वेळेस ते वाचले.



सत्यासाठी झगडणाऱ्यांनाही शिक्षा होतेच !

मग पोलिसांनी दामू जोशी या क्रांतिकारकामार्फत भाऊरावांचे मन खोटी साक्ष देण्यासाठी वळविण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. शेवटी भाऊरावांच्या आईलासुद्धा भाऊचे मन खोटी साक्ष देण्यासाठी वळविण्यास सांगण्यात आले. पण आई स्पष्ट म्हणाली, "मी माझ्या भाऊला चांगला ओळखते. मी सांगून तो मुळीसुद्धा ऐकणार नाही. तो सत्य कधी सोडणार नाही."

शेवटी भाऊरावांच्या सातारच्या खोलीत खोटी कागदपत्रे ठेवून खोटा पुरावा उभा करण्याचा प्रयत्न केला. पण भाऊंच्या घरमालकीणबाई अंबुताई मुद्राळे यांनी पोलिसांसमोर साक्षात रणचंडीचे रूप धारण केले. पोलिसअधिकाऱ्यांची पुरती फजिती केली व हात हालवत परत पाठवून दिले.

गणपत मांग या खोटी साक्ष देण्याचा धंदा करणाऱ्या दरोडेखोरास कोर्टात खोटी साक्ष देण्यास तयार केले. गणपत साक्ष देण्यासाठी साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभा राहिला. त्याने समोर आरोपीच्या पिंजऱ्याकडे पाहिले. आरोपी भाऊराव होते. साक्ष द्यायची बाजूलाचे राहिले. तो धावत पिंजऱ्यातून बाहेर आला. भाऊरावांकडे गेला व भर कोर्टात म्हणाला, "अहो हे पाटील मास्तर, देवमाणूस आहेत! गोरगरिबांच्या मुलांना फुकट शिकवतात. अडल्यानडल्या गरिबांना मदत करतात. मी नाही ह्यांच्या विरुद्ध खोटी साक्ष देणार." या शिक्षेविरुद्धचे अपील भाऊरावांनी जिंकले. पण डांबरप्रकरणचा निकाल लागेपर्यंत सरकारने भाऊरावांना कच्च्या कैदेत डांबून ठेवले.

शेवटी आईवडिलांचे प्रयत्न व प्रत्यक्ष शाहू छत्रपतींचे मार्गदर्शन यामुळे भाऊरावांची या प्रकरणामधून निर्दोष मुक्तता झाली. काही कारण नसता भाऊराव यात गोवले गेले. त्यांना छळाचे हलाहल पचवावे लागले. पण भाऊरावांनी सत्य सोडले नाही.

❑❑❑

## नोकरी करायची नाही

भाऊरावांचे पणजोबा नेमगोंडा पाटील, यांना सामाजिक कार्याची आवड होती. ते कोल्हापूरच्या जैन मठाचे प्रमुख होते. त्यांना पैसेही उत्तम मिळत; पण तो पैसा गोरगरीब, अडल्यानडल्यांसाठी ते खर्च करत. सर्वांशी प्रेमाने वागत. सर्वांना धीर देत. आधार देत.

या वंशावळीतील रत्न म्हणजे भाऊराव. निर्भयपणा, सत्यवृत्ती, धाडस, न्यायाची चाड, अन्यायाची चीड, विनय, नम्रता, भेदाभेद न मानणे, सर्वांशी समानता, गरिबांबद्दल जिव्हाळा, आपुलकी, कणव आणि त्यांच्यासाठी काम करण्याची, झटण्याची वृत्ती, कष्ट झेलण्याची तयारी हे अनुवंशिकतेचं बाळकडू भाऊला लहानपणीच मिळालं होतं.

भाऊ ऐन उमेदीत आला. त्याचा आत्मविश्वास वाढला. त्यानं शाहू महाराजांच्या परवानगीनं कोल्हापूर सोडलं. कोल्हापूरला जैन बोर्डिंगमध्येच मुंबईचे माणिकचंद हिराचंद जव्हेरी या व्यापाऱ्याची ओळख झालेली. ते

दानशूर वृत्तीचे, गरिबांबद्दल कळकळ असलेले होते. भाऊची सचोटी व प्रामाणिकपणा त्यांनी पाहिला होता. या जव्हेऱ्याने 'भाऊ' नावाच्या रत्नाची बरोबर पारख केली होती. हा पुढं शिकणार नाही हेसुद्धा त्यांनी हेरलं होतं.

त्यांनी भाऊला मुंबईला नेलं. आपल्या पेढीवर काम शिकायला ठेवलं. पण भाऊंचं मन तिथं रुळलं नाही. भाऊ परत घरी साताराला आले.

याच काळात भाऊरावांचे वडील निवृत्त झाले होते. घरात आवक नव्हती. निवृत्तीवेतन अपुरे होते. सर्व जबाबदारी मोठा मुलगा म्हणून भाऊरावांवरच आली. याच काळात भाऊरावांचं लग्न झालं होतं. कुंभोजच्याच एका श्रीमंत गृहस्थांनी शिकलेला मुलगा म्हणून नव्वद तोळे सोनं घालून थाटात आपल्या मुलीचं लग्न करून दिलं. आता भाऊ एकटे नव्हते. पत्नीचीसुद्धा जबाबदारी त्यांच्यावर होती.

भाऊंनी हिमतीने आणि स्वाभिमानाने घर सोडले. स्वतः वाटेल ते कष्ट करीन. वेळ-प्रसंगी उपाशी राहीन पण अपमानी जीवन कधीच जगणार नाही अशी प्रतिज्ञा करूनच त्यांनी घर सोडलं.

ते सातारहून किर्लोस्करवाडीत आले. किर्लोस्करांना भेटून काम देण्याची विनंती केली. भाऊरावांना किर्लोस्करांचे नांगरांचे फाळ विकण्याची एजन्सी मिळाली. भाऊंनी चिकाटीने काम केले. पण तिथंही भाऊचं मन रमलं नाही. तेही काम भाऊरावांनी सोडलं.

ओगले हे भाऊरावांचे वर्गमित्र. त्यांनी काचकारखाना सुरू केला होता. त्यांनी भाऊरावांना कंदिलांची एजन्सी दिली. पण या [illegible] वाटेना. ते कामही सुटलं

दोन नोकऱ्या सुटल्या. पण भाऊराव धडपडे, नुसतं बसणं, चकाट्या पिटणं त्यांना आवडत नव्हतं. पोट भरणाऱ्या जबाबदारीचीही त्यांना जाणीव होती. लोकांच्या पुढं हात पसरणं त्यांच्या मनाला पटत नव्हतं. तशातच यापुढे नोकरी करायची नाही हा निश्चय त्यांनी केलेला.

मग काय करायचं ? त्यांनी खूप खूप विचार केला. शेवटी मनाला समाधान देणारा, स्वाभिमान सांभाळून स्वावलंबी करणारा एक मार्ग त्यांना सुचला, निरक्षरांना साक्षर करण्याचा, शिकवण्या करण्याचा.

त्याचं असं झालं. भाऊरावांनी वडिलांनी मिळवून दिलेली मुलकी खात्याची नोकरी सोडली. मुंबईची नोकरी सोडली. किर्लोस्कर, ओगले यांची एजन्सी सोडलेली आणि नोकरी न करण्याची प्रतिज्ञा केलेली. अशात घरी पाहुणे आले.

रात्रीच्या वेळी जेवता जेवता पाहुण्यांनी वरिष्ठांकडे भाऊराव काय करतात याची चौकशी केली.

'काही कामबिम करत नाही. पण हो, एक महत्त्वाची गोष्ट मात्र तो न चुकता करतो' वडील बोलत होते. भाऊरावाने कान टवकारले.

'ती कोणती गोष्ट बरं ? पाहुण्यांनी विचारले.

'काही नाही. दोन वेळेला खायचं आणि गावभर हिंडायचं.' वडील खोचकपणे बोलून गेले. आपल्या पतीचा पाहुण्यांदेखत झालेला पाणउतारा ऐकून भाऊरावांच्या पत्नी लक्ष्मीबाईंच्या डोळ्यांत टचकत पाणी उभं राहिलं. भाऊरावांच्या डोक्यावर तर जण

घणाघातच झाला. आता काहीतरी करून दाखवलंच पाहिजे असा निश्चय करून भाऊराव उठले.

या तिरीमिरीतच भाऊरावांनी घर सोडले. खिशात पैसे नाहीत. वडिलांना पैसे मागायचे नाहीत. प्रवासाची साधनं नाहीत. अशा स्थितीत कोरेगावपासून १७-१८ मैल (सुमारे २७ कि. मी.) अंतरावर असलेले सातारा पायी चालत जाऊन गाठले. त्या वेळचं सातारा डोंगराच्या कुशीतच छोटंसं गाव होतं. व्यापार-पेठ नाही. कारखाने नाहीत. सारं सारं उजाड माळरान. १५-२० हजारांची लोकवस्ती.

भाऊराव विचार करू लागले 'काय करायचं इथं? आपण इथं कशाला आलो ? मुंबईची पेढीवरची नोकरी सोडण्यात आपण चूकच केली. किती भला माणूस होता! माणिकचंद छत्रपतींच्या प्रभावानं दलितांसाठी काही करू इच्छिणारा, मूळ जैन कर्मठपणा सोडलेला, उदार, दानशूर ! खरंच अशा माणसाला सोडण्यात चुकलच आपलं.'

नोकरी तर करायची नाही. धंद्यासाठी गाठी चार पैसे नाहीत. मग करायचं काय ?

❑❑❑

## बीज अंकुरले

भाऊरावांना खूप विचार करता करता एक व्यवसाय सापडला. बिनपैशाचा, बिन-भांडवलाचा, मनाला समाधान मिळवून देणारा. शिकवण्या करणे. हो हो, शिकवण्याच करायच्या. तसं मनाशी त्यांना थोडं हसूच आलं. स्वतः जास्त शिकलो नाही. मॅट्रिकचा अभ्यास केलेला नाही. त्या आधी कधी उच्चश्रेणीत पास झालेलो नाही. शिकण्यात गतीच नसल्यामुळे धड लिहिताही येत नव्हते. अस्खलितपणे वाचताही येत नव्हते आणि म्हणे शिकवण्या करायच्या.

पण संकल्प तर सोडला आणि एकदा निश्चय केला की माघार घेण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. 'हाती घ्याल ते तडीस न्या' ही त्यांची वृत्ती. मग स्वतःला कधी त्रास होवो. कितीही कष्ट पडोत. यश मिळेपर्यंत पिच्छा सोडायचा नाही. हेच त्यांचे ब्रीद होते.

शिकवण्या सुरू केल्या. त्यासाठी स्वतः अभ्यास करू लागले. खूप वेगवेगळी पुस्तके वाचून ज्ञान वाढवू लागले. गावातील हुशार शिक्षकांकडे जाऊन मार्गदर्शन घेऊ लागले. पूर्ण तयारीनिशी दोन दोन तास मुलांना शिकवू लागले. मुलांना अगदी आधुनिक, अद्ययावत ज्ञान देऊ लागले. पाटील गुरुजींनी मुलांची मनं जिंकून घेतली. मुलांना गुरुजींचं शिकवणं आवडू लागलं. मुलं चांगल्या गुणांनी पास होऊ लागली.

होता होता अगदी लवकरच पाटील मास्तरांची कीर्ती सर्वत्र पसरली. पहाता पहाता-बोलबोलता शिकवण्या वाढल्या. पैशांची आवक वाढली. नावाजलेली सुशिक्षित मंडळी, मोठ्या अधिकारावर असलेली माणसं आपली मुलं पाटील मास्तरांकडे शिकवणीला पाठवू लागली. साताराचे प्रसिद्ध नामांकित वकील

डेसाभाई, सातारचे डेप्युटी कलेक्टर पेठे-साहेब यांच्या मुलांच्या शिकवण्या भाऊरावांना मिळाल्या.

त्यात गंमत अशी की, पेठेसाहेबांच्या मुलाला संस्कृत शिकवायचं होतं. भाऊरावांना तर संस्कृत येतच नव्हतं. पण शिकवणी तर स्वीकारली. जबरदस्त आत्मविश्वास आणि कष्टाची तयारी तर होतीच. सातारचे प्रसिद्ध पंडित गजेंद्रगाडांकडे स्वतः संस्कृत शिकण्यास सुरुवात केली. त्यांच्या इथं जाऊन स्वतः आधी शिकायचं आणि मग घरी येऊन पेठे-साहेबांच्या मुलाला शिकवायचं. शेवटी मुलगा संस्कृतमध्ये चांगल्या मार्कांनी पास झाला. असेच पोप नावाचे कलेक्टर होते. त्यांना मराठी येत नव्हतं. त्यांचीही शिकवणी पाटील गुरुजींना घ्यावी लागली. कलेक्टरना मराठी शिकवलं.

त्या काळी सरकारी नोकरांना दरमहा १०-१५ रुपये पगार असायचा. भाऊराव यांना मात्र या शिकवण्यांमधून दरमहा चांगले ८०-९० रुपये मिळायचे. गोर-गरिबांच्या मुलांकडून मात्र ते फी घेतच बसत. आता बस्तान ठीक बसलं. मग पाटील मास्तर शिकवता शिकवता मुलांना मानवतेची, समानतेची शिकवण देऊ लागले. समाजसेवेचे बीज अशा तऱ्हेने येथे अंकुरायला लागले होते.

आता त्यांनी सातारला आपली पत्नी लक्ष्मीबाई यांना बोलावून घेतले आणि आपले बिऱ्हाड थाटले. अशा तऱ्हेने त्यांना शिकवणे आवडू लागले. त्यातून पैसा मिळाला. नाव मिळाले. समाजसेवकांशी संबंध आले. हे संबंध दृढ झाले. ह्या संबंधांतून भारत जनरल इन्शुरन्स या विमा कंपनीची एजन्सी मिळाली. त्यासाठी ते महाराष्ट्रभर हिंडले. एक वर्षात एक लाख रुपयांचे काम पूर्ण केले. त्यामुळे विमा कंपनीत त्यांना प्रतिष्ठा मिळाली.

स्वतःच्या जिद्दीने, प्रयत्नाने आणि आत्मविश्वासाने या मिळालेल्या यशामुळे मुळातच असलेला आत्मविश्वास अधिकच दुणावला. उत्साह वाढला. हौस उत्पन्न झाली.

❑ ❑ ❑

## संस्थेचा पाया घातला

गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी काही तरी केलं पाहिजे असं आता भाऊरावांना सारखं वाटायला लागलं. दुधगावचे मद्वान्ना मास्तर व भाऊसाहेब यांनाही तसंच वाटत होतं.

दुधगावाच्या शाळेत लांबून लांबून चालतच विद्यार्थी येत असत. त्यांच्या राहण्याची सोय करायचं ठरलं. मग मद्वान्ना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्यासह भाऊरावांनी "दुधगाव शिक्षण प्रसारक मंडळ" नावाच्या संस्थेची स्थापना केली व या संस्थेमार्फत एक वसतिगृह दुधगाव येथे सुरू केले. येथे सर्व जातींच्या, धर्मांच्या मुलांना मुक्त प्रवेश होता. पुढे मग सांगली

जिल्ह्यातील पेठ नेर्ले येथेही एक वसतिगृह या संस्थेमार्फत सुरू करण्यात आले.

अशा तऱ्हेने आजच्या विशाल अशा रयत शिक्षण संस्था, या शिक्षणसंस्थेची सुरुवात 'दुधगाव शिक्षण प्रसारक मंडळा'तूनच झाली असे म्हटले तर वावगे होणार नाही.

दुधगावच्या वसतिगृहात ४०-५० विद्यार्थी होते. नेर्ले गावच्या वसतिगृहाचे उद्घाटन कलेक्टर मायसी यांच्या हस्ते दि ८-२-१९२१ रोजी करण्यात आले होते. यावेळी कलेक्टर मायसी यांनी भाऊरावांची खूपच प्रशंसा केली होती.

५ सप्टें. १९१९ रोजी काले ता. कराड जिल्हा सातारा येथे सत्यशोधक समाजाची मोठी परिषद भरली होती. भाऊराव तर प्रथम पासूनच सत्यशोधक चळवळीत होते. काल्याच्या परिषदेत भाऊरावांनी अतिशय प्रभावी भाषण केले. त्यांनी लोकांना सांगितले की, 'दीनदलित बहुजनसमाजातील लोकांच्या दुःखाचे मूळ कारण अज्ञान आहे. ते दूर करण्यासाठी बहुजनसमाजाच्या सर्व थरांमध्ये शिक्षण गेलेच पाहिजे. यासाठी शिक्षणसंस्था काढली पाहिजे.

परिषदेला उपस्थित असलेल्या सर्वच सभासदांना भाऊराव यांचा हा विचार पसंत पडला. मग याच परिषदेत शिक्षणसंस्था काढण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. संस्थेचे नाव ठरले 'रयत शिक्षणसंस्था'. मग ४ ऑक्टो. १९१९ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर या रयत शिक्षणसंस्थेची स्थापना करण्यात आली.

प्रथम रयत शिक्षणसंस्थेने वसतिगृह सुरू केले. संस्थेची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली व ती छापून घेतली. या उद्दिष्टांमध्ये मागासवर्गीय समाजात शिक्षणाची आवड उत्पन्न करणे, सर्वांना मोफत शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे, मागास निरनिराळ्या जाती-जातींतील विद्यार्थ्यांमध्ये प्रेमभाव निर्माण करणे, त्यांना मिळूनमिसळून वागण्याची सवय लावणे, त्यामधून संघशक्ती निर्माण करणे, अंधरूढी--परंपरांना फाटा देणे, मुले काटकसरी, स्वावलंबी, उद्योगी, उत्साही, शीलवान, नियमितपणा मानणारी तयार करणे या गोष्टींनाच प्राधान्य देण्यात आलेले होते.


मानव ही एक जात. मानवता हाच धर्म हा विचार विद्यार्थ्यांच्या मनात रुजवून त्यांच्या व्यक्तित्वाची घडण त्या दृष्टीने करणे यावर भर दिलेला आहे असे या उद्दिष्टांवरून आपणांस दिसून येईल.

❑❑❑

## मुष्टीयोजना

संस्थेचे कामकाज करता यावे म्हणून कामासाठी पूर्ण वेळ देता यावा म्हणून भाऊरावांनी नोकरी सोडली. वसतिगृहाचा खर्च चालविण्याचा प्रश्न होता. कार्यात लोकांचा सहभाग हवा होता. लोकांना या कार्याबद्दल आत्मीयता वाटणे आवश्यक होते. भाऊरावांनी यासाठी एक योजना तयार केली.

वसतिगृहाचा फार मोठा खर्च मुलांच्या



भाऊरावांच्या मुष्टियोजनेला घराघरांतून प्रतिसाद मिळाला.

भोजनावर होतो. लोक तर पैसे देण्याचे टाळतात. मग लोकांना पैसे न मागता धान्यच मागायचे. श्रीमंत तर देतीलच. पण गरिबांनाही या योजनेत सहभागी करून घ्यायची एक योजना तयार केली तीच मुष्टी योजना.

त्या काळात आजच्यासारख्या धान्य दळण्यासाठी गिरण्या नव्हत्या. घराघरांतून दगडी जाती असायची. स्त्रिया सकाळी उठून जात्यावर दळण दळायच्या. जात्याजवळच भिंतीला खिळ्यावर एक पिशवी टांगून ठेवायची. सकाळी किंवा दिवसात कधीही पण दळणापूर्वी घेतलेल्या धान्यातील एक मूठभर धान्य त्या टांगलेल्या पिशवीत टाकायचे. आठवड्यात एक दिवस वसतिगृहातील विद्यार्थी गावात घरोघर जाऊन या पिशवीत साठविलेले धान्य गोळा करायचे व वसतिगृहात घेऊन यायचे. मुष्ठीयोजना सफल झाली. लोकांनी साथ दिली.

भाऊरावांनी महाराष्ट्रभर शाळा, वसतिगृहे काढली. मग भाऊराव, वसतिगृहातील विद्यार्थी, शिक्षक सुगीच्या दिवसांत गावागावांत खळ्यावर जाऊ लागले. धान्य गोळा करू लागले. जमिनीचा सारा वसूल करताना, लग्न, मुंज, बारसे, वास्तुशांती, पायाभरणी इ. मंगल-प्रसंगी भाऊराव किंवा कार्यकर्ते स्वतः तेथे जात व यजमानाकडून देणगी वसूल करत असत. अशा तऱ्हेने हा कार्यक्रम लोकांच्या पर्यंत पोहोचला. तो लोकांना आवडला. या कार्याबद्दल लोकांमध्ये जागृती उत्पन्न झाली. आत्मीयता निर्माण झाली. आता लोक

या कार्यासाठी स्वतः होऊन, स्वखुषीने देणग्या देऊ लागले. गावागावांमधून, घराघरांमधून भाऊरावांचे कार्य पोहोचले. भाऊरावांच्या शिक्षणकार्याचा प्रचार व प्रसार होऊन हा शिक्षणयज्ञ-ज्ञानयज्ञ अव्याहत सुरू रहावा हा या मागचा उद्देश होता. भाऊराव ज्या घोंगडीच्या ओट्यात देणग्या जमा करीत त्याच ओट्यात माणसेही गोळा करीत असत.

जनतेच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी अण्णांनी-भाऊरावांनी एक क्रांतिकारक पत्रक सुद्धा काढले होते. खरं तर त्यांना क्रांतिकारक साप्ताहिक पत्रकच काढायचे होते. त्यासाठी त्यांनी पत्रक काढले होते. ते १-११-१९२३ रोजी सातारा येथे प्रसिद्ध केले होते.

यानंतर १९२४ साली सातारा येथे संस्थेच्या कार्याची सुरुवात झाली. पुढे त्यांनी जिथे जिथे जातिभेदाचे, उच्चनीचतेचे दर्शन घडले तेथे तेथे जाऊन त्यांनी बंड केले. समानतेसाठी संघर्ष केला. 'मानवता ही जात, माणुसकी हा धर्म. देवाच्या दारी भेदभाव नाही. अज्ञान-अंधकार घालविण्यासाठी शिक्षण घ्या. दुष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा नाहीशा करा. लग्न-समारंभासाठी कर्ज काढू नका. जातिभेद मानू नका. दारूचे व्यसन करू नका' असे विचार त्यांनी जनतेच्या पुढे सतत मांडले.

स्वदेशीच्या चळवळीत मुंबईमध्ये महात्मा गांधी यांच्या देखत १९१० साली भाऊरावांनी आपल्या साहेबी थाटाच्या पोषाखाची होळी केली आणि खादीचा स्वीकार केला. जाड्या-भरड्या खादीचे कपडे आपल्या शरीरावर धारण केले. नेहरूशर्ट, गुडघ्यापर्यंत धोतर, हातात काठी, छातीपर्यंत वाढलेली शुभ्र दाढी, डोक्यावर काही शिरस्त्राण नाही, पायांत कसलेही पादत्राण नाही, असे 'कर्मवीर' शिक्षणातील ऋषीमुनीच शोभू लागले.

❑❑❑

## स्वावलंबी शिक्षण

'श्रमाशिवाय संपत्ती मिळाली तर हे जग-सुद्धा स्वर्गासारखे भयंकर होईल' असे म्हटले आहे. एका दृष्टीने हे अगदी खरं आहे. कोणतीही गोष्ट अगदी फुकट मिळाली की तिची किंमत रहात नाही. म्हणूनच कर्मवीर भाऊराव यांनी शिकण्याची इच्छा असणारांना शिकण्याची संधी देण्याचा प्रयत्न केला पण त्यासाठी स्वतःची संपत्ती नाही तर निदान श्रम तरी खर्च करायला हवेत असा मार्ग निवडला. हा मार्ग म्हणजेच स्वावलंबी शिक्षण.

वसतिगृहात राहणारे विद्यार्थी वसतिगृहातील सर्व कामे स्वतः करीत असत. मग खरेदी असो, स्वयंपाक असो, जागेची, कपड्यांची, भांड्यांची स्वच्छता असो. सर्व कामे मुलांनी स्वतः करावीत. त्यासाठी मुलांचे गट पाडले जात. त्यांना कामे वाटून दिली जात. त्यांच्यावर एक सेक्रेटरी नेमला जाई व स्वतः भाऊरावांच्या मार्गदर्शनाखालीच सर्व कामे केली जात असत. शेतीची कामेही गट पाडून केली जात असत.

विद्यार्थ्यांनी स्वतःच स्वयंपाक केल्याने आचाऱ्यांचा पगार वाचला. त्या वाचलेल्या

पैशातून म्हशींची खरेदी केली. मुलांना दूध-दुभते मिळू लागले. धनिनीच्या बागेत ७-८ एकर शेतजमीन होती. या जमिनीची मशागत करण्यासाठी चार बैल घेतले. मग बैलगाडी, नांगर, कुळव इ. शेतीसाठी आवश्यक औजारे घेतली. विहिरीतून पाणी काढण्यासाठी रहाट-गाडगे, मोट घेतली. या शेतीत गहू, ज्वारी, भात, सोयाबिन ही धान्ये, चिंचा, नारळ, आंबा, फणस, कवठ ही फळे होऊ लागली. ती विकून उत्पन्न मिळू लागले. वसतिगृहाच्या खर्चाला हातभार लागू लागला. अर्थात यांची विक्री बाजारात नेऊन किंवा शहरात फिरून विद्यार्थीच करत असत.

वसतिगृहात कामाच्या स्पर्धा ठेवत. शेतीत पिकांच्या स्पर्धा ठेवत. विजयी गटांना बक्षीस दिले जाई. वसतिगृहात तालीम असे. मुलांना व्यायाम करावा लागे. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांना कुस्तीची आवड लागली. अण्णा या विद्यार्थ्यांसाठी कुस्त्यांचे मैदान घेत.

सुट्टीत मोलाने शेतात काम करण्यासाठी जात. गवंड्याच्या हाताखाली, सुताराच्या हाताखाली, रंगाऱ्याच्या हाताखाली जात व उत्पन्न मिळवीत. याशिवाय पुण्याच्या वसतिगृहातील कॉलेज शिकणाऱ्या मुलांच्या परीक्षा लवकर आटोपत. मग ते सातारला येत व हायस्कूलमधल्या मुलांच्या अभ्यासाची तयारी करून घेत असत. अशा तऱ्हेने 'एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ' अशी या विद्यार्थ्यांची वृत्ती होती.

यामुळेच विद्यार्थ्यांच्या मनावर श्रम-प्रतिष्ठेचे महत्त्व कोरले गेले. कोणतेही काम हलके नाही ही भावना दृढमूल झाली व मग कुठेही कसलेही काम करण्याचा संकोच वाटेनासा झाला.

वसतिगृहात–शाळेत कठोर शिस्तीचे पालन करावे लागे. यातूनच गुरुजनांबद्दल आदराची भावना, शिस्तीची आवड मनातून निर्माण व्हायची व ती तशीच पुढे टिकायची.

स्वाभिमान, नम्रता, विनय, आज्ञाधारक-पणा, वक्तशीरपणा याचबरोबर स्वदेशप्रेम, जातिधर्माची बंधने तोडून सर्वच विद्यार्थ्यांत बंधुतेची भावना निर्माण होण्यास स्वावलंबी शिक्षणाने मदतच केली. यातूनच निःस्वार्थ व त्यागभावनेची जोपासना झाली. चोखंदळपणा व व्यवहारकुशलता या गुणांची वाढ विद्यार्थ्यांच्या मनात होत गेली.

स्वावलंबी शिक्षणातून खराखुरा विद्यार्थी, खराखुरा माणूस घडवला जात होता. म्हणूनच 'स्वालंबनातून शिक्षण' हा मंत्र अतिशय मूलगामी ठरला होता. निकोप समाजनिर्मितीसाठी अशाच शिक्षणामधून निर्माण होणारी पिढी काहीतरी करू शकेल अशी आशा त्या वेळी सर्वांना वाटत होती. अर्थात ती अनाठायी नव्हती. □□□

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ...
बाल ... विभाग
दा. क्र. २९६२ ... ३/३/८४
विषय ...

# स्मारके

भाऊरावांनी स्वावलंबी शिक्षण देत असतानाच या विद्यार्थ्यांसमोर राष्ट्रासाठी प्रचंड कार्य करणाऱ्या थोर थोर विभूतींचा आदर्श समोर ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे या थोर विभूतींची कायमची स्मारके आपली विद्यामंदिरे व्हावीत म्हणून या विद्यामंदिरांना या थोर विभूतींची नावे देऊन त्यांची चिरंतन स्मारके निर्माण केली.

पूज्य महात्मा गांधी, ठक्करबाप्पा, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची नावे कित्येक विद्यामंदिरांना दिली. साताराच्या वसतिगृहास छत्रपती शाहूंचे नाव दिले तर महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पुण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुण्यात 'युनियन बोर्डिंग सुरू केले. हे बोर्डिंग पुणेकराराची आठवण देते. त्याचे असे झाले-

हरिजनांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सरकारकडे आग्रह धरला होता; तर असे मतदारसंघ असू नयेत असे महात्मा गांधींचे मत होते. आंबेडकरांच्या ठरावास विरोध म्हणून गांधीजींनी १९३२ मध्ये पुणे येथील येरवडा कारागृहात उपोषण सुरू केले. कर्मवीर भाऊरावांना दोघांबद्दल आदर होता. ते आंबेडकरांकडे गेले. आंबेडकरांचे मत-परिवर्तन करण्यात त्यांनी यश मिळविले. गांधी-आंबेडकर समझोता झाला. याची आठवण म्हणून १९३२ साली युनियन बोर्डिंगची त्यांनी पुण्यातच स्थापना केली.

बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या नावानेही कॉलेजला त्यांचे नाव दिले. तसेच क्रांतिवीर स्वामी रामानंद भारती, हुतात्मा राजगुरू यांची नावे देऊन स्मारके (विद्यामंदिरे) उभी केली. महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव दिले. तसेच डॉ. आंबेडकरांच्या मातोश्री भीमाबाई यांच्या नावाने कन्याशाळा सुरू केली.

अशा तऱ्हेने समाजासाठी झटणाऱ्या व्यक्तींची स्मारके निर्माण करून समाजऋण अल्प अंशाने का होईना कमी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

❑❑❑

# मुलांवरची माया

वसतिगृहात रहावयास येणारी मुलं लांब लांबच्या गावावरून येत. आई-वडिलांना सोडून आलेल्या मुलांना परकेपणा वाटू नये, आईवडिलांची उणीव भासू नये म्हणून भाऊराव खूप काळजी घेत असत. ही मुलं भाऊराव व त्यांच्या पत्नी या दोघांनाही घरच्यापेक्षा जास्त अगत्याची वाटत. सख्ख्या मुलांपेक्षाही जास्त जीव या मुलांना लावत.

भाऊरावांचा मुक्काम वसतिगृहात असताना ते मधून मधून रात्री उठत. हातात

कंदील घेऊन सर्व मुलांची पाहणी करत कुणी उघडा झोपला असला, कुणाच्या अंगावरचं पांघरूण सरकलं असलं तर ते नीट अंगावर घालत असत. कुणी लोळत लोळत अंथरुणाबाहेर गेला तर त्याला ते अंथरुणावर आणून ठेवत असत.

एकदा एक मुलगा कडक थंडीत कुडकुडताना त्यांना दिसला. तेव्हा ते स्वतः त्याच्याजवळ झोपले. अंगावर एक घोंगडं घातलं. त्याला पोटाशी धरून थोपटलं. त्याला स्वस्थ झोप लागल्यावर ते उठून दुसरीकडे गेले.

भाऊराव कधी कधी परगावी जात. त्यांच्या गैरहजेरीत वसतिगृहाची व्यवस्था सौ. लक्ष्मीबाई बघत असत. वेळप्रसंगी पैशांची अडचण आली असता आपले दागिने विकत व वसतिगृहाची अडचण दूर करीत. दागिना मोडल्याबद्दल कधी भाऊराव रागवत. माझे मी बघेन म्हणत. एकदा लक्ष्मीबाई भाऊरावांना म्हणाल्या,

"पुरुषांना फक्त कसं बोलावं तेवढंच कळतं. पण उपाशीपोटी पोरांची काय कालवाकालव होत असते हे फक्त आईच्याच मनाला कळतं. मुलांना उपाशी तळमळत ठेवून मी दागिने घालून कुठं मिरवू ! मुलांची वेळच्या वेळी भूक भागवणं, त्यांना आनंदी, समाधानी ठेवणं हे दागिन्यांपेक्षा मला जास्त समाधानाचं वाटतं. ते कसं ते नाही कळणार तुम्हांला !"

गुढीपाडव्याचा दिवस होता तो. भाऊराव पाटील बाहेरगावी गेलेले. वसतिगृहाच्या व्यवस्थापकाकडचे सारे पैसे संपलेले. शेवटी सौ. वहिनी-लक्ष्मीबाईकडे जाण्याशिवाय उपाय नव्हता. मुलांचा सेक्रेटरी लक्ष्मीबाईकडे गेला. त्याने पैसे संपल्याचे सांगितले. मागची उधारी थकलेली. कुणी उधार देईना. लक्ष्मीबाईंनी थोडा वेळ विचार केला. सर्व दागिने संपले होते. शेवटचा एकच दागिना सौभाग्यअलंकार शिल्लक होता. तो त्यांना काढून दिला. तो मोडून मुलांसाठी गोडधोड आणायला सांगितले.

सौ. लक्ष्मीबाईंचं निधन ३० मार्च १९३० रोजी गुढीपाडव्यालाच झालं. पण त्यांनी भाऊरावांना जवळ बोलावून सांगितले, 'साऱ्या पोरांना पुरणपोळीचा स्वयंपाक करा. सण साजरा करा. मुलांना सोडून कुठं जाऊ नका. मला खांदेकरी म्हणून वसतिगृहातील मुलेच घ्या.'

❑❑❑

## संत गाडगेबाबांकडून गौरव

संत गाडगेबाबांची प्रसिद्धी महाराष्ट्रभर झाली होती. ते गावोगाव हिंडत. लोकांना समजेल अशा भाषेत कीर्तन करत. त्यातून लोक शिक्षण करत. अंधश्रद्धा, अयोग्य रूढी परंपरांवर हल्ला चढवत. नेहमीच्या व्यवहारातीलच दृष्टांत, विनोदी शैली, नम्रभाव यामुळं त्यांचं बोलणं ऐकणाऱ्यांच्या मनावर परिणाम करत असे.

ते रेल्वेने जातायेता पाडळी स्टेशनला उतरत. अण्णांच्या घरी येत. लक्ष्मीबाईंना भाजीभाकरी मागत. लांब झाडाखाली बसून भाकरी खात पण त्याशिवाय ते जात नसत. त्यावेळी भाऊरावांचा व बाबांचा परिचय नव्हता.

पंढरपूरचा विठोबा महाराष्ट्राचे दैवत. पंढरपूर ही गाडगेबाबांची कर्मभूमी. आषाढी

किंवा कार्तिकी वारीच्या वेळी भाऊराव पंढरीला जाऊन येत. तिथे संत गाडगेबाबांची भेट घेत असत. परळीजवळ दरेगाव येथे एकदा कीर्तन करताना गाडगेबाबा म्हणाले होते, 'माझी व साताराच्या दाढीवाल्या बाबांची (भाऊराव पाटलांची) याआधी लवकर भेट झाली असती तर मी लोकांकडून मिळालेले हजारो रुपये घाट, मंदिरे, गोशाळा, धर्मशाळा बांधण्यासाठी जे खर्च केले ते सर्व ज्ञानमंदिरे उभी करण्याकरिता व शिक्षणासारख्या अतिशय पवित्र अशा कामासाठी खर्च केले असते. पांडुरंगाचे इथेच अधिष्ठान आहे.

सातारा येथे महाराज सयाजीराव हायस्कूलचा कोनशिलासमारंभ होता. त्यावेळी बाबांचे कीर्तन झाले. बाबा म्हणाले, "लोकहो मुलांना शिकवा. कर्ज काढून सण करू नका, दारू पिऊ नका, मांसाहार करू नका. भाऊरावांनी तुमचे भले करण्यासाठी शाळा काढल्या आहेत. त्यांना मदत करा." सातारा जिल्ह्यातील कुसूर येथे कीर्तन करताना बाबा म्हणाले, "भाऊरावांनी शिक्षणाचे काम आरंभिले आहे. गोरगरिबांची, सगळ्या जाती-जातींची अनाथ मुले गोळा करून त्यांना ते शिकवितात. त्यांना चोहोबाजूंनी मदत करा." तर बंडोपंत मुकादमांना ते म्हणाले, 'भाऊरावांचे काम हे देवाचे काम आहे. यापुढे त्यांना मदत करा." बाबांचा उपदेश मुकादमांनी मानला.

नौखालीतील हिंदू-मुसलमान दंग्याच्या काळात म. गांधींच्या हस्ते भाऊरावांना एक लाखाची थैली विद्यार्थी देणार होते. पण गांधीजी येऊ शकले नाहीत. मग गाडगेबाबां-च्याहस्ते समारंभ झाला. तेव्हा बाबा म्हणाले, 'आपल्या देशाला जसे धान्य, पाऊस हवा तसेच भाऊरावांसारखी माणसे हवीत. भाऊराव पाटलांच्या कार्यावर जनतेने पाऊस पाडावा.'

१९४८ साली शासनाने रयत शिक्षण-संस्थेची मदत–अनुदान बंद केले. गैरसमजातून हे घडले होते. पण त्यानंतर भाऊरावांची व गाडगेबाबांची भेट झाली. हे कसे घडले त्याचा वृत्तांत भाऊ- रावांनी गाडगेबाबांना सांगितला. बाबा म्हणाले, 'भाऊराव, तुमचं काम हे देवाचं काम आहे. तुम्ही जगलं पाहिजे. तुम्ही जा. मी पहातो काय करायचं ते.'

मग बाबा त्या वेळचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांना भेटले. त्यांना पहाताच खेर उठून उभे राहिले. का येणं केलं ? म्हणून विचारलं. बाबा म्हणाले, 'तसं काम निघालं म्हणूनच आलो.' खेरांना खात्री होती बाबा जनसेवे खेरीज कोणतंच काम आणणार नाहीत. ते म्हणाले, "आपण आज्ञा करा. काम करून टाकू"

मग बाबांनी भाऊरावांचे काम सांगितले व म्हणाले, 'गरीब, दलित मुलांच्या डोक्यात भाऊरावांमुळे प्रकाश पडतो आहे. तो दिवा विझवू नका. इतकंच मागणं आहे.'

खेर म्हणाले, 'बाबा, तुम्ही जा. काय करायचं ते मी पाहतो. पुढे सरकारचे गैरसमज दूर झाले व अनुदान पुन्हा सुरू झाले.

❑❑❑

# भाऊराव व ठक्करबाप्पा

ठक्करबाप्पा हे थोर समाजसेवक. आदिवासींच्या उद्धाराचे काम त्यांनी केले. पहिली आदिवासी संघटना त्यांनी स्थापन केली. कस्तुरबा ट्रस्ट निर्माण करून त्याचे काम पाहिले. अखिल भारतीय दलित साहित्य संघ स्थापन केला. हिंद सेवक समाजाचेही कार्य केले. त्यांचा व भाऊरावांचा जुना स्नेहसंबंध होता.

भाऊराव पाटील चालवीत असलेल्या व्हॉलंटरी शाळांच्या कामकाजांची ते पाहणी करत असत. कोयनाखोऱ्यातील हेळवाक, देवापूर, पिंगळी या मागास भागांतून भाऊराव व ठक्करबाप्पांनी बैलगाडीतून लोकजीवनाची व शिक्षणकार्याची पाहणी केली. म. गांधींनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघाच्या हरिजन वेल्फेअर फंडाचे ठक्करबाप्पा सेक्रेटरी होते. अण्णांचे कार्य पाहण्यास ते वारंवार येत. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकऱ्यांच्या मदतीने या फंडातून भाऊराव चालवीत असलेल्या वसतिगृहास ५०० रुपयांची मदत १९३३ पासून ४ वर्षे मिळत होती.

मल्हारपेठ गावाजवळ डांबरखडी टेकडी आहे. तिलाच गांधी टेकडी म्हणतात. ३ जून १९४५ रोजी ठक्करबाप्पा मल्हारपेठला आले. लोकांनी ५७ बैल जोडलेल्या गाडीतून त्यांची मिरवणूक काढली. ढोल-लेझीम लावली. गांधी टेकडीवर जायचे होते. शाळेच्या शेडचे साहित्य आधीच पुढे गेले होते. ठक्करबाप्पा व भाऊराव टेकडी चढून गेले. उद्घाटनसमारंभ उत्साहात पार पडला. भाऊरावांनी शाळेला नाव दिले 'ठक्करबाप्पा विद्यालय.गांधी टेकडी'

अशा तऱ्हेने एका थोर समाजसेवकाचे, संतपुरुषाचे, दलितउद्धारकाचे कायमचे स्मारक भाऊरावांनी केले. ❑❑❑

# म. गांधींकडून गौरव

२५ फेब्रु. १९२५ रोजी म. गांधींनी रयत शिक्षणसंस्थेस भेट दिली. त्यावेळी त्यांनी हिंदीत लिहिलेला अभिप्राय आशय असा-

श्री. भाऊराव पाटलांनी बांधिलकीच्या भावनेतून ही संस्था सुरू केली. समाजातील दैन्य पाहून बहुजनसमाजात शिक्षण-प्रसार करण्याचा त्यांनी निश्चय केला. माझे मतपरिवर्तन हे त्याचेच फल होय. जगातील कोणतेही गुलाम राष्ट्र लोक-जागृती व लोकशिक्षण याशिवाय स्वतंत्र होऊ शकत नाही. आपल्यासारखे धुरंधर नेते उदयास आले आहेत हे आमचे मोठे भाग्य आहे. यामुळेच बहुजन समाजात जाज्वल्य राष्ट्रप्रेम, स्वाभिमान व नवचैतन्य निर्माण झाले आहे. समाजपरिवर्तन व राष्ट्र-संवर्धनाचे त्यांचे कार्य आहे.

यावेळी गांधीजी बोलले, "मला साबरमती आश्रमात जे करता आले नाही ते तुम्ही यशस्वी करून दाखविले. सर्वांना स्वातंत्र्य-लढ्यात एकत्र आणण्याचे माझे स्वप्न प्रत्यक्षात आणलेत. आपल्या कार्यास माझ्या शुभेच्छा व आशीर्वाद."


गांधीजींनी ९-१-१९४८ रोजी भाऊरावांना पत्र लिहिले होते. त्यात ते लिहितात,"श्री. भाऊराव पाटील की सेवा ही उनका सच्चा कीर्तिस्तंभ है। फिर भी छात्रोंने जो प्रवृत्ती की है वह उनके लिये [illegible] है। श्री. भाऊराव दीर्घकाल तक से

BVBK-0402942


















बालगोपाल
-किशोरकिशोरींकरिता
थोर संत -महात्म्यांच्या
संस्कारक्षम बोधात्मक












सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.





